NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

दिनांक ०३.११.२०२६ मंगळवार

मा. न्यायालयातुन आरोपीला कारावासाची शिक्षा :–

दिनांक ०३.११.२०२६ रोजी, मा. जिल्हा अतिरिक्त सत्र न्यायाधीश–१५, नागपुर, श्रीमती एच. ए. अन्सारी मॅडम यांनी त्यांचे कोर्टाचे विशेष केस क्र. ३६१/२०२३ मधील, पोलीस ठाणे कपिलनगर येथील अप. क्र. १९६/२०२३ कलम ३५४(ए)(१)(i),३५४(बी) भा.दं.वि., सहकलम ८,१२ पोक्सो या गुन्ह्यातील आरोपी गणेश रामसिंग उईके, वय ४३ वर्षे, रा. नाका नंबर २, खसाळा गाव, हनुमान मंदीर जवळ, कपिलनगर, नागपूर याचेविरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, **आरोपीस कलम ८ पोक्सो कायद्यान्वये ०३ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा व ५००/–रू. दंड व दंड न भरल्यास १५ दिवस कारावासाची, कलम १२ पोक्सो कायद्यान्वये ०१ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा व २००/–रू. दंड व दंड न भरल्यास १५ दिवस कारावासाची शिक्षा ठोठावली.**

दिनांक १५.०५.२०२३ चे १५.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे कपिलनगर हद्दीत राहणाऱ्या ३६ वर्षीय फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी ही घरी एकटी असतांना, यातील आरोपीने तिचे अल्पवयीन व एकटे असल्याचा फायदा घेवुन, तीचेसोबत तीचे ईच्छेविरूध्द अश्लिल कृत्य करून, तिचा विनयभंग केला. फिर्यादी घरी आल्यानंतर पिडीतेने घडलेला प्रकार सांगितला असता, फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे कपिलनगर येथे आरोपींविरूध्द वर नमुद कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला होता. आरोपीस दिनांक १६.०५.२०२३ रोजी अटक करण्यात आली होती.

गुन्ह्याचे तत्कालीन तपासी अधिकारी पोउपनि. सचिन धात्रक यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्रीमती योगीता राऊत यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्री. यादव ईशान गजभिये यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी मपोहवा. प्रेरणा अंबादे व पोअं. देवानंद थोरात यांनी काम पाहिले.

(कामगिरी)

१) मा. पोलीस उपआयुक्त, परि.क्र. ४ विशेष पथकाची कामगिरी :– अंमली पदार्थाचे गुन्हयातील पाहीजे आरोपीस अटक.

नागपुर शहर, परिमंडळ क्र. ४ अंतर्गत, पोलीस ठाणे नंदनवन येथे दाखल अप.क्र. २६४/२०२३ कलम ८(क),२२(ब),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट अन्वये गुन्हयातील पाहिजे आरोपी संबंधात, मा. पोलीस उपआयुक्त, परिमंडळ क्र. ४ यांचे विशेष पथकातील अधिकारी व अंमलदार यांना मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरुन, त्यांनी दिनांक ०३.११.२०२६ रोजी सापळा रचुन, आरोपी नामे विशाल विनायक गजभिये वय २९ वर्षे, रा. खरबी, श्रीराम नगर, प्लॉट क्र. ६, महागंगा सेलिब्रेशन जवळ, वाठोडा, नागपूर यास पोलीस ठाणे वाठोडा हद्दीतुन ताब्यात घेतले. आरोपीस अटक करुन, पुढील कार्यवाहीस्तव नंदनवन पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती रश्मिता राव, पोलीस उपआयुक्त, परिमंडळ क्र. ४ यांचे मार्गदर्शनाखाली, सपोनि. प्रशांत साबळे व त्यांचे पथकाने केली.



२) गुन्हेशाखा वाहन चोरी विरोधी पथकाची कामगिरी :— हद्दपार ईसमास शस्त्रासह अटक.

दिनांक ०३.११.२०२६ चे १५.३० ते १६.१० वा. चे सुमारास, गुन्हेशाखा वाहन चोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार हे आरोपींचे शोधार्थ पेट्रोलींग असता, त्यांना माहिती मिळाली की, प्रज्वल बागडे नावाचा हद्दपार इसम शस्त्र बाळगुन फिरत आहे. अशा माहितीवरुन, पोलीस ठाणे वाडी हद्दीत, खडगाव रोड, खाडे ले—आऊट, जनजागृती फायनान्स जवळ प्राप्त वर्णनाचा एक ईसम दिसुन आला. त्यास ताब्यात घेऊन, पंचासमक्ष नाव विचारले असता, त्याने त्याचे नाव प्रज्वल उर्फ धम्मा अनिल बागडे वय २५ वर्षे रा. रामजी आंबेडकर नगर, राम मेश्राम यांचे घरी किरायाने, वाडी, नागपूर असे सांगितले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे कंबरेत पॅन्टचे आत एक हत्तीमार चाकु कि. ७००/—रू. चा मिळुन आल्याने जप्त करण्यात आला. आरोपीस युनिट कार्यालय येथे आणुन त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ०१/२०२४ दिनांक १२.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने आपलेसोबत शस्त्र बाळगुन समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे वाडी येथे आरोपीविरूध्द कलम १४२,१३५ म.पो.का. सहकलम ४,२५ भाहका अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. आरोपीस पुढील कार्यवाहीस्तव वाडी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. पप्पु कादरी, पोहवा. रोशन तिवारी, विलास कोकाटे, अजय शुक्ला व पोअं. राहुल कुसरामे यांनी केली.

३) यशोधरानगर पोलीसांची कामगिरी :— गांजा बाळगणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक ०२.११.२०२६ चे २३.३५ वा. चे सुमारास, यशोधरानगर पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, शाहीद नावाचा इसम पंचवटी ग्राऊंड समोरील गल्ली, धम्मदीप नगर येथे गांजा विक्री करीत आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन, नमुद ठिकाणी जाऊन, पाहणी केली असता, तेथे प्राप्त वर्णनाचा इसम एका पिशवीसह दिसुन आला. त्याचेकडे जात असता, तो

पोलीसांना पाहुन पळु लागला. त्याचा पाठलाग करुन त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव अब्दुल सईद उर्फ शाहीद अब्दुल नवाब वय ५२ वर्ष रा. धम्मदीपनगर, यशोधरानगर, नागपुर असे सांगीतले. त्याचे जवळील पिशवीची पाहणी केली असता, त्यामध्ये अंमली पदार्थ गांजा वजनी ३२४ ग्रॅम कि. ९,७२०/—रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता गांजा विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपीचे कृत्य हे कलम ८(क), २९(ब),ii(अ) एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपीविरूध्द पोलीस ठाणे यशोधरानगर येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (कळमणा विभाग) यांचे मार्गदर्शानाखाली, वपोनि. युनुसचांद शेख व त्यांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.

(गुन्हे)

१) पोलीस ठाणे पाचपावली :—शस्त्र बाळगुन धुमाकूळ घालणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक ०२.११.२०२६ चे २०.५५ वा. चे सुमारास, पाचपावली पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना बारसे नगर, कलकत्ता रेल्वे लाईनजवळ सार्वजनिक ठिकाणी एक इसम हातात शस्त्र घेवून धूमाकूळ घालतांना दिसुन आला. त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले व त्याचे हातातील मोठया आकाराचा चायना चाकु काढुन घेऊन त्यास नि:शस्त्र केले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव शाहीद अली उर्फ हेमंत लोचा अकबर अली वय २१ वर्षे रा. बंगाली पंजा, लेंडी तलाव, हबीबभाई काचवाले यांचे घराजवळ, पाचपावली, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन चायना चाकु किंमती ५००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु घेवुन धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, फिर्यादी पोहवा. राजेश कोकाटे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे पाचपावली येथे पोउपनि. राजेंद्र जाधव यांनी आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का. सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे एमआयडीसी :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

फिर्यादी जीवन नामदेवराव डेहनकर वय ४० वर्ष रा. प्लॉट क्र. २७७, महात्मा गांधी नगर, हुडकेश्वर, नागपूर व त्यांच्या सहकारी नामे सौ. प्रियंका प्रविण मोरे (प्रियंका साहेबराव खांडेकर) वय ३५ वर्ष रा. आरती एम्पायर, विवेकांनद हॉस्पिटल जवळ, नागपुर हे दोघे वायसीसी कॉलेज, वानाडोंगरी, एमआयडीसी येथे प्रोफेसर पदावर कार्यरत आहेत. दिनांक ०३.११.२०२६ चे १०.०० वा. चे सुमारास, फिर्यादीच्या सहकारी सौ. प्रियंका हया त्यांचे ॲक्सेस दुचाकी क्र. एमएच ४९ सीएन ६८९३ ने पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीतील हिंगणा रोडने झोन चौक येथुन आपले कार्यस्थळी जात असता, कोणत्यातरी अज्ञात ट्रकचालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे सहकारी यांचे मोपेडला धडक मारून, त्यांना गंभीर जखमी करुन, घटनास्थळावरून पळुन गेला. जखमी यांना उपचाराकरीता शालिनीताई मेघे हॉस्पीटल, वानाडोंगरी येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषित केले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे पोउपनि. मनिषा जाधव ७०७५४८४५७१ यांनी अज्ञात ट्रक चालक आरोपीविरूध्द कलम २८१,१०६(१) भा.न्या.सं., सहकलम १८४, १३४,१७७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपी पुढील तपास सुरू आहे.

(ईतर)

<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–</u>

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

अ	कोर्टाचे नाव	केस क्र.	कलम	आरोपीचे नाव व पत्ता	पेशी तारीख
१	मा. ८ वे प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर.	१४१०/२००८	कलम २९४ भा.दं.वि.	शेख लतिफ उर्फ बब्बा वल्द शेख हमीद, रा. चिखली झोपडपट्टी, भैसवाले च्या घराजवळ, कळमणा, नागपुर.	१६.११.२०२६

स्वा/–
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.